# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८

दूरध्वनी - २३०७५५३९/२३०२३९०० e-mail : pro@msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२

## प्रसिध्दी पत्रक क्र. ४८

## शिर्डीकरिता एस. टी.ची अतिजलद सेवा

**मुंबई, शुक्रवार, दि. २७.८.२०१०**

मुंबई - ठाणे - बोरीवली परिसरातून श्री साईदर्शनासाठी शिर्डीला जाणा-या भाविकांसाठी रा. प. महामंडळ रविवार, २९ ऑगस्ट, २०१० पासून पुढीलप्रमाणे **नवीन बांधणीच्या आरामदायी अतिजलद** बसेस सुरु करणार आहे :-

| वेळ | मार्ग | प्रकार | प्रवासभाडे रु. |
|---|---|---|---|
| २०.०० | **बोरीवली** - ठाणे - नाशिक - **शिर्डी** | परिवर्तन | २३३/- |
| २१.०० | **बोरीवली** - ठाणे - नाशिक - **शिर्डी** | निमआराम | २७०/- |
| २१.३० | **दादर** - ठाणे - नाशिक - **शिर्डी** | निमआराम | २६५/- |
| २२.०० | **दादर** - ठाणे - नाशिक - **शिर्डी** | निमआराम | २६५/- |
| २२.३० | **दादर** - ठाणे - नाशिक - **शिर्डी** | निमआराम | २६५/- |

सध्या दादरहून शिर्डीसाठी एसटीच्या दररोज १७ निमआराम बसेस धावत असून त्यात वरील अतिरिक्त अतिजलद बसेसची भर पडणार आहे.

रेल्वेच्या तुलनेत एस. टी. च्या वरील बसेस कमी वेळात शिर्डीला पोहोचणार असल्याने प्रवाशांच्या वेळेत बचत होणार असून रेल्वेला स्पर्धा निर्माण होणार आहे. तसेच, श्री साईबाबा संस्थानाचे अध्यक्ष मा. ना. जयंतरावजी ससाणे यांना रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी या बसेसने प्रवास करणा-या प्रवाशांच्या श्री साईदर्शनाची विशेष व्यवस्था करण्याबाबत विनंती केली आहे.

एस. टी. च्या उपरोक्त सेवेचा प्रवाशांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**